# प्रेस नोट

दिनांक -०६/०२/२०१९

**स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई - बनावट फेसबुक खाते तयार करुन तसेच मोबाईल व्दारे अश्लील संदेश पाठविणारे दोन भामटे गजाआड**

---

जिल्ह्यात बनावट फेसबुक खाते तयार करुन महिलांना अश्लील संदेश पाठवुन त्यांचेशी अश्लील संभाषण करुन महिलांना त्रास देण्याचे प्रमाण वाढत असल्याने तसेच जिल्ह्यात दाखल गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेकडुन समांतर तपास चालु असताना मा.पोलीस अधीक्षक श्री.दिक्षीत गेडाम, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री निमीत गोयल यांचे सुचनेनुसार पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करण्यात आलेले होते.

निवती पोलीस ठाणे गु.र.नं ७४/२०१८ भादंवि कलम ३५४(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(ड),६७ या गुन्हयातील बनावट फेसबुक खाते उघडुन फिर्यादि हिचेशी अश्लील संभाषण केल्याबाबत वरील गुन्हा अज्ञात इसमाविरुध्द दाखल होता सदर अज्ञात इसमाचा शोध घेवुन त्यास बांदा,उभाबाजार येथुन ताब्यात घेवुन त्यास वेंगुर्ला पोलीस ठाण्यात हजर केले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत खोत हे करीत आहेत.

मालवण पोलीस ठाणे गु.र.नं ७४/२०१८ या गुन्हयातील फिर्यादिस मोबाइल व्दारे कॉल तसेच संदेश पाठवुन अज्ञात इसम अश्लील संभाषण केले बाबत गुन्हा दाखल होता त्याचा शोध घेवुन त्यास कुडाळ(आंब्रड) येथुन अटक करण्यात आलेली आहे.

तसेच मा.पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातील सर्व महिलांना अवाहन दिले आहे कि अशा प्रकारचे कोणतेही कृत्य त्यांचे सोबत घडत असेल तर त्यांनी त्याबाबत तात्काळ स्थानिक पोलीस ठाण्यात संपर्क साधुन माहिती द्यावी व त्या प्रकारणाची तात्काळ दखल घेतली जाईल.

सदर कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील याचे मार्गदर्शनाखाली विनीता कुलकर्णी,सपोनि,रविराज फडणीस पोलीस उपनिरीक्षक, खंदारे, कोयंडे, कृष्णा केसरकर, रवि इंगळे, अमित तेली, प्रथमेश गावडे, भक्ती सावंत यांनी विशेष कामगिरी केली आहे.

---

**पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग करीता**